10/15 10/2015 GB 2015-16

# HUMAN RIGHTS EDUCATION IN SOCIAL SCIENCES

(Multilingual)

**Edited By**
**Dr. S. S. Rane**
**Mr. D. D. Kinge**

330

**Published By**

Scanned by TapScanner

ISBN -978-81-922212-7-4
Human Rights Education in Social Sciences

# INDEX


| Sr. No. | Title | Author | Pg. No. |
|---|---|---|---|
| 1 | SOCIAL STUDIES, LANGUAGES AND HUMAN RIGHTS | DR. S.S. RANE | 01-03 |
| 2 | HUMAN RIGHTS AND HIGHER EDUCATION IN INDIA | Dr. T. V. MUNDE | 04-10 |
| 3 | A HUMAN RIGHTS EDUCATION IN INDIAN SCHOOLS: CURRICULUM DEVELOPMENT | MR. DAYANAND OVHAL | 11-16 |
| 4 | मानवी हक्क आणि शिक्षण व्यवस्था | डॉ. शोभा टी. चौधरी | 17-20 |
| 5 | मानवी अधिकार आणि शिक्षण | प्रा. वृषाली कोल्हे | 21-24 |
| 6 | मानवी हक्क शिक्षण | डॉ. प्रमोद आ. अहिरे | 25-27 |
| 7 | शालेय शिक्षणात मानव अधिकाराचे महत्त्व | प्रा. देविदास मा. दरेगांवे<br>प्रा. शंकर वसतकार | 28-30 |
| 8 | HUMAN RIGHTS AND TERRORISM | PROF. TUKARAM P. MORE | 31-38 |
| 9 | QUESTIONS OF HUMAN RIGHTS IN COUNTER INSURGENCY OPERATIONS | Dr. J A KHAN | 39-41 |
| 10 | भारतातील दहशतवाद व मानवाधिकाराच्या समस्या | प्रा. ताराचंद एम. सावसाकडे | 42-48 |
| 11 | `कोर्ट मार्शल` मानवाधिकार हनन की सटीक अभिव्यक्ति | प्रा. देवेंद्र नारायण बोंडे | 49-51 |
| 12 | मानवी हक्क आणि सामाजिकता एक दृष्टीक्षेप | प्रा. श्रेया चौधरी | 52-55 |
| 13 | मानवाधिकार आणि बालकामगारांचा प्रश्न | प्रा. गजानन ब. घायाळ | 56-59 |
| 14 | सत्यशोधकी मानवाधिकाराचा लढा | राठोड मुरलीधर संपतराव | 60-62 |
| 15 | जागतिकीकरण आणि मानवी हक्क | प्रा. डॉ. सुनील सं. मायी | 63-65 |
| 16 | POOR CONDITION OF HUMAN RIGHTS OF WOMEN IN INDIAN ENGLISH FICTION | DR. GANESH S.CHAVAN | 66-69 |
| 17 | मानवाधिकार शिक्षा और महिलाए | डॉ. सुधीर एन. शर्मा | 70-72 |


Scanned by TapScanner

ISBN -978-81-922212-7-4
Human Rights Education in Social Sciences

# मानवाधिकार आणि बालकामगारांचा प्रश्न

**प्रा. गजानन ब. घायाळ**
कला व विज्ञान महिला महाविद्यालयै, मेहकर
मो. न. ९८८१८८७३८७

मानवाधिक ार ही संकल्पना मानवी इतिहास पूर्वकाळापासून अप्रत्यक्षरित्या चालत आलेली आहे. पाश्चिमात्य राजकिय विचारवंतानुसार मॅग्नाकार्टा दस्तावेज हे मानवाधिकारांना स्पष्ट करणारे ठरले आणि त्यानंतरच राजेशाही शासन व्यवस्थेचा पर्याय म्हणून लोकशाही शासनव्यवस्था अस्तीत्वात आली. लोकशाही शासनव्यवस्था असलेला समाज हा लोकशाही समाज म्हणून प्रस्थापित झाला. या लोकशाही समाजाने मानवाधिकाराला अन्य समाजापेक्षा अधिक स्विकृत केले व क्रियान्वीत केले. अन्य समाजाशी व्यवहार करतांना या मानवाधिकाराचा उपयोग हा लोकशाही समाज करु लागला. लोकशाही असलेले राज्य व लोकशाही नसलेली राज्य असे राज्यांचे वर्गिकरण केल्यास २० व्या शतकाच्या अखेरीस लोकशाही असलेल्या राज्यांनी संयुक्त राष्ट्रसंघाने १० डिसंबर १९४८ ला आत्मसात केलेल्या मनवाधिकारचा समावेश आपल्या संविधानात केलेला आढळतो. पृथवीच्या ज्या भूभागवर मानवाधिकार लागू पडलेले नाहीत तेथे मानवाधिकार हे ध्येय व उद्दिष्टये २१ व्या शतकात मानवाधिकार आयोगाने निश्चित केले आणि लागू केले.

२० व्या शतकाच्या अंतिम दशकात विज्ञान व तंत्रज्ञान संशोधनामुळे जी नवनविन दालने उघडण्यात आली ती नविन दालने २१ व्या शतकात मानवाधिकरात नविन आयामांची भर निश्चिपणे टाकेल. संयुक्त राष्ट्रसंघाने व मानवाधिकार लागू करण्यासाठी प्रयत्नशिल असलेल्या विकसीत देशांनी मानवाधिकार व गरिबी याची सांगड घातली. गरिबीचे उच्चाटन म्हणजेच मानवाधिकारांना व्यवहारात क्रियान्वित करणे हे सुत्र त्यांनी मानले व भैतिक विकास हे साधन मानले हो भौतिक विकास प्राप्त केलेल्या राज्य मानवाधिकराची होत असलेली पायमल्ली असे स्पष्ट करते की, भौतिक विकासातुन मानवाधिकाराला व्यवहारिक बनविणे शक्य झालेले नाही. म्हणून २० व्या शतकाच्या अखेरच्या दशकाला आर्थिक प्रगती ऐवजी व्यक्ती व राष्ट्रंना विकासाची समान संधी हे अधिकर मानवाधिकारात समाविष्ट केले तरच २१ व्या शतकात जे विज्ञान व तंत्रज्ञान मानवी कल्याणासाठी उपयोगात आणले जाईल व त्याव्दारे मानवाधिकाराचे क्रियान्वयन अधिक मोठया प्रमणात, मोठया क्षेत्रात यशस्वीपणे लागुकरता येईल.

२१ व्या शतकात अणूविज्ञान हे अत्यंत क्रान्तीकारी ठरलेले आहे. आज अणू विज्ञानाचा उपयोग कृषिक्षेत्र, वैज्ञानिक क्षेत्र, वाहतुक, कॉम्प्युटर इ. क्षेत्रात यशस्वीपणे केली जात आहे. परिणामस्वरुप राज्या राज्यातील अर्थात राष्ट्रीय समाजामधील अंतर कमी कमी होत आहे. भौतिक विकास साधण्यासाठी नविन संशोधनाने नॅनोसायन्स व नॅनो टेक्नॉलॉजीची दालने उघडलेले आहेत. नॅनो टेक्नॉलॉजीमध्ये तिसरी औद्योगिक क्रांती उघडण्याची क्षमता आहे. भारत, अमेरिका जपान व युरोपियन युनियनने नॅनो टेक्नॉलॉजीच्या क्षेत्रात संशोधनाला



Scanned by TapScanner

ISBN -978-81-922212-7-4


शोषणग्रस्त व अन्यायपुर्ण वातावरणात जीवन व्यतीत करणाऱ्या लहान बालकांचा वनवास संपल्याचे मात्र प्रत्ययास येत नाही. मानवी अधिकारांच्या संरक्षणासंबंधी राष्ट्रीय मानव अधिकर आयोग आणि राज्य स्तरावर घटक राज्यांमध्ये राज्य मानव अधिकर आयोग स्थापन झाले आहे. राष्ट्रीय मानव अधिकर आयोगाची स्थापना १२ ऑक्टांबर १९९३ च्या अंतर्गत करण्यात आली. मानवी अधिकराचे संरक्षण आणि संवर्धन राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाच्या कार्यांचा एक मुख्य विषय राहीला आहे. भारतामध्ये ४० कोटीहून अधिक बालक आहेत आणि ही बालके निश्चित राष्ट्राची सर्वात मोठी संपत्ती आहे. बालकांच्या अधिकारांना मान्यता देताना आणि त्यांच्या प्रती आपल्या दायीत्वाचा उल्लेख करुन भारतीय संविधानामध्ये सर्व प्रथम त्यांच्या अधिकारांचे संरक्षण केल्या गेले आहे २१ व्या शतकात भारतामध्ये बालअधिकाराच्या संदर्भात असलेली स्थिती पुढील मुद्याच्या आधारे स्पष्ट करता येईल.

१) बालाकांच्या प्रती लैंगिक हिंसेच्या संबंधामध्ये प्रचार माध्यमांसाठी संहिता :-बालकांच्या प्रती लैंगिक हिंसेच्या विषयावर एक सुसंगत, संवेदशनशील तसेच प्रभावी स्वरुपामध्ये बालकांच्या अधिकार आणि हिताला अनुसरुन असेल अशी संहिता प्रचार माध्यमांसाठी राष्ट्रीय मानव अधिकार आयोग आणि प्रचार भारतीने युनीसेफच्या समर्थनावरुन संयुक्त स्वरुपात तयार केली आहे. संहितेचा मुख्य उद्देश प्रचार माध्यमांच्या कर्मचाऱ्याना लैगिक हिंसेच्या प्रती बालक अधिकारांचे रक्षण करण्यामध्ये मदत करण्याचा आहे.

२) सरकारी कर्मचाऱ्यांव्दारा बालकांच्या रोजगारीला थांबविण्यासाठी सेवानियमांचे संशोधन :- सरकारी कर्मचाऱ्याव्दारा १४ वर्षाच्या आतील बालकांच्या रोजगारीला थांबविण्यासाठी राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने केंद्रीय आणि राज्यसरकाच्या कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीला संचालीत करणाऱ्या संबंध सेवानियमाना संशोधित करण्यासंबंधी शिफरस केली होती. त्याला अनुसरुन प्रशिक्षण विभाग, भारत सरकारने ऑक्टोंबर १९९९ मध्ये केंद्रीय नागरी सेवा नियम, १९६४ मध्ये तसेच फेब्रवारी २०० मध्ये अखिल भारतीय सेवा नियम १९६८ मध्ये संशोधन केल्या गेले. केंद्र सरकारने संशोधित नियमांना योग्य कार्यवाहीसाठी सर्व राज्यांना पाठविले होते फक्त मणीपूर राज्य सोडून सर्व राज्य शासनाने आपल्या कर्मचाऱ्यांच्या वर्तणुक नियमांमध्ये अपेक्षीत संशोधन केले आहे.

३) बालश्रम पध्दत :- भारतामध्ये बिहार राज्यात बालश्रमाची वाईट परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामध्ये जोखीम आणि गैरजोखीम व्यवसाय किंवा प्रक्रिया अशा दोन्हीमध्ये बालक कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे.

330

**निष्कर्ष :-**

बालश्रमला समाप्त करण्यासाठी गैरसरकारी संघटनांबरेबर राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने केलेल्या काही प्रयत्नांना यश मिळाले आणि देशाच्या जास्तीत जास्त भागांमध्ये ही विनाशकारी प्रथा अजुनही सुरु आहे. बालश्रमाच्या संबंध विषयाला बाल अधिकारांच्या परिप्रेक्षाच्या दृष्टीने पाहिजे पाहिजे त्यासाठी अनुच्छेद २१, ३९ (च) आणि ४५ च्या बरोबर संविधानाचे अनुच्छेद २४ तसेच बालअधिकर अभिनियम १९८९ च्या उपबंधाना पुढे आणणे आवश्यक आहे. अधिनियम १९६७ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी त्याच्या कार्यान्वयात सहभागी असलेल्या जिल्हाधिकरी पोलीस, गैरसरकारी संघटन आणि अन्य स्थानिक कार्यकत्यांना सुध्दा संवेदनशिल बनविले

Scanned by TapScanner

माल - 2016



आधि शिक्षण देणे गरजेचे आहे. महिला आणि बालकांच्या देहव्यापाराच्या समस्येला अवगत करण्यासाठी आणि विभिन्न दावेदारामध्ये जागृकता निर्माण करण्याच्या उद्देशाने न्यायिक अधिकरी, पोलीस आणि सरकारी अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले पाहिजे. बालविवाहाच्या समस्येला निवारण्यासाठी लोकांना संवेदनशील बनविण्यासाठी तसेच त्यांना या विषयावर शिकवण देण्यासाठी देशभरातील प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातुन व्यापक सतरावर जागृती केली जावी.

**संदंर्भ :-**

१) U.N. gupta, human rights
२) D. vijapayi and R. nataajan, technology and development
३) Journal of the Institute o human right science, Technology and human rights vol vi no Dec.२००८
४) Year Book Times of India

330

Co - Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana

Scanned by TapScanner